नियमीत दिवाणी दावा क्र. १४०००२५/२०१४

गुलाब वि. ऊषा

निशाणी क्र. ७३ खाली

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १**

**शपथेवर सरतपास सुरु :–**

**सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. के. एम. नेवरे यांच्यामार्फत :–**

६} मी निशाणी क्र. ७३ वर माझे सरतपास शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सरतपास शपथपत्रातील मजकुर माझ्या विधीज्ञाने माझ्या सांगण्याप्रमाणे लिहील्यानंतर मला वाचून दाखवला आहे.

७} प्रतिवादी क्र. १ यांच्या वडीलांचे नाव छोटू सेगू खोटे असे होते व ते मरण पावले आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी माझ्याशी घरविक्रीचा करार दि. २१/०५/२०१४ रोजी केला होता. सदरचा करारनामा वर्णन यादी नि.क्र. ७५ वरील अनु.क्र. १ वर दाखल आहे. विक्रीचा करारनामा हा नोंदणीकृत नसून नोटराईज्ड असून त्यास वादीच्या विधीज्ञांनी हरकत घेतली. त्यास **आर्टिकल–अ** देण्यात येतो. सदर करारनाम्यावर माझी सही आहे व वरची सही प्रतिवादी क्र. १ ची आहे. त्यावर दोन साक्षीदारांच्या देखील सही आहे.

**सरतापास पूर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. पी. बी. बांते यांच्यामार्फत :–**

वादीचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/–

(ए. ए. शिरवळकर)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक.

रामटेक.

दिनांक : २२/०१/२०२६